महालक्ष्मी



अभीप्सा

अखिल भारतीय पत्रिका
ऑक्टोबर २०२६
वर्ष ५१ अंक १०

महालक्ष्मी

संपादकीय.....०२
महालक्ष्मीचे स्वरूप.....०४
महालक्ष्मीचा एक पैलू – धनशक्ती.....११
महालक्ष्मीचा एक पैलू – सौंदर्य.....१९
महालक्ष्मीचा एक पैलू – सुसंवाद २७
महालक्ष्मीचा एक पैलू – प्रेम.....३५

संपादकीय

महाशक्तीची महेश्वरी, महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती ही चार रूपं आहेत. त्यातील महालक्ष्मीच्या रूपाचा 'अभीप्सा' मासिकाच्या या अंकात विशेषत्वाने विचार करण्यात आला आहे.

महाशक्तीच्या चारी रूपांमध्ये मानवी समाजाच्या दृष्टीने महालक्ष्मीचे रूप सर्वात जास्त मनोहारी आहे. महालक्ष्मीचे स्वरूप कसे असते, विश्वरचनेमध्ये तिचे नेमके स्थान काय आहे, तिचे कार्य कोणते, मानवी जीवनामध्ये महालक्ष्मीचे वास्तव्य कायम राहावे म्हणून कोणती खबरदारी घेतली पाहिजे यासंबंधी श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांनी जे सांगितले आहे, त्यावर 'अभीप्सा' मासिकाचा हा अंक आधारित आहे.

संपादक, अभीप्सा मासिक

**

अभीप्सा मासिक हे श्रीअरविंद सोसायटी, पाँडिचेरीचे मुखपत्र आहे.

योगी श्रीअरविंद म्हणजे पूर्वाश्रमीचे क्रांतिकारक अरविंद घोष आणि श्रीमाताजी म्हणजे पूर्वाश्रमीच्या मीरा अल्फासा, (फ्रान्स). 'श्रीअरविंद आश्रम' हा भारताच्या पूर्व किनाऱ्यावर पाँडिचेरी येथे आहे.

महालक्ष्मीचे स्वरूप

दिव्य मातेचे चार पैलू

भौतिक लीलेमध्ये दिव्य मातेचे जे कार्य चालते, तिचे या विश्वाला जे मार्गदर्शन लाभते त्यामध्ये, दिव्य मातेचे चार महान पैलू, चार नेतृत्वकारी शक्ती आणि तिची चार व्यक्तित्वं अग्रस्थानी असतात.

महेश्वरी – शांत व्यापकता व आकलनकारी प्रज्ञा आणि प्रशांत कृपा व अक्षय करुणा, तसेच राज्यपदाला मागे टाकणारी, सार्वभौम, सर्व–सत्ताक महत्ता हे दिव्य मातेचे एक व्यक्तित्व होय.

महाकाली – मातेचे दुसरे व्यक्तित्व म्हणजे तिच्या गौरवशाली सामर्थ्याची शक्ती, दुर्दम्य आवेग, तिची युयुत्सू भाववृत्ती, तिचा अत्याधिक तीव्र संकल्प, तिची त्वेषपूर्ण चपळता आणि विश्वाला हलवून टाकणारी तिची ताकद!

महालक्ष्मी – सौंदर्य, सुसंवाद, उत्कृष्ट लयतालबद्धता यांच्या रहस्याची अद्भुतता, प्रफुल्लता, माधुर्य आणि गहन व सूक्ष्म समृद्धी, दिव्य मातेचे मंत्रमुग्ध करणारे आकर्षण आणि तिची मनोहर कृपा हे दिव्य मातेचे तिसरे व्यक्तित्व होय.

महासरस्वती – मातेचे चौथे व्यक्तित्व हे, तादात्म्यातून येणाऱ्या ज्ञानाची घनिष्ठ व गभीर क्षमता, काळजीपूर्वक केलेले निर्दोष कर्म व स्थिरता आणि सर्व गोष्टींमधील अचूक परिपूर्णता यांनी सुसज्ज असते.

दिव्य मातेची उपरोक्त चार व्यक्तित्वं येताना स्वतःसोबत 'प्रज्ञा, सामर्थ्य, सुसंवाद आणि परिपूर्णता' हे गुणविशेष घेऊन येतात. विभूतींच्या माध्यमातून मानवी रूप धारण करून ही व्यक्तित्वं येतात. दिव्य मातेच्या चैतन्यमय प्रभावाला जी व्यक्ती स्वतःची पार्थिव प्रकृती थेटपणे खुली करू शकते, त्या व्यक्तीच्या आरोहणामध्ये हे गुणविशेष दैवी प्रमाणात आढळून येतात.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 17-18)

*

महालक्ष्मीचा एक पैलू – धनशक्ती

संपत्तीचा योग्य विनियोग

संपत्ती ही एक शक्ती आहे. मी तुम्हाला मागेही एकदा सांगितले होते की, ती प्रकृतीची शक्ती आहे. वाहते पाणी ही जशी गतिशील शक्ती असते तशीच संपत्ती देखील खेळती राहिली पाहिजे, ती गतिशील शक्ती बनली पाहिजे. नवनिर्माणासाठी, नवीन व्यवस्था निर्माण करण्यासाठी तिचा विनियोग केला गेला पाहिजे.

संपत्ती हे एक अतिशय सोयीस्कर साधन आहे. वस्तुंचे पूर्ण आणि मुक्त वितरण करण्यासाठी उपयुक्त ठरेल असे ते केवळ एक साधन आहे.

या शक्तीचा सर्वोत्तम उपयोग कसा करायचा हे ज्यांना माहीत आहे त्यांच्या हाती ती शक्ती असली पाहिजे. म्हणजे मी सुरुवातीला म्हटले त्याप्रमाणे, ज्या लोकांनी स्वतःमधील प्रत्येक वैयक्तिक इच्छावासना आणि प्रत्येक आसक्ती नाहीशी केली आहे किंवा ज्यांनी स्वतःची त्यापासून सुटका करून घेतली आहे त्यांच्या हाती ही शक्ती असली पाहिजे.

यालाच आणखी एका गोष्टीची जोड देणे आवश्यक आहे. पृथ्वीच्या गरजा काय आहेत हे जाणण्याची पुरेशी व्यापक दृष्टी त्यांच्याकडे असणे आवश्यक आहे. म्हणजे गरजांची व्यवस्था कशी लावायची आणि संपत्तीरूपी शक्तीचा विनियोग कसा करायचा याचे संपूर्ण ज्ञान अशा व्यक्तींकडे असले पाहिजे.

याशिवाय, अशा व्यक्तींकडे जर उच्चतर आध्यात्मिक ज्ञान असेल तर अधिक बरे! म्हणजे मग, दिव्य शक्ती आणि दिव्य कृपा पृथ्वीवर ज्या गोष्टींद्वारे आविष्कृत होऊ शकतील अशा गोष्टींच्या घडणीसाठी ते या धनशक्तीचा विनियोग करू शकतील.

आत्ता पैसा, संपत्ती, आर्थिक शक्ती ही एखाद्या अभिशापासारखी आहे, पण तिचा योग्य विनियोग झाला तर तीच शक्ती, सर्वांच्या कल्याणासाठी एक परम आशीर्वाद ठरेल. कारण मला वाटते, ज्या गोष्टी

महालक्ष्मीचा एक पैलू – सौंदर्य

सौंदर्य आणि त्याचे कार्य

भौतिक जगतातील सर्व वस्तुमात्रांमध्ये दिव्यत्वाचे सर्वोत्तम आविष्करण सौंदर्याद्वारे होत असते.

भौतिक जगत हे आकाराचे जग आहे आणि आकाराचे परिपूर्णत्व म्हणजे सौंदर्य.

सौंदर्य हे शाश्वत ब्रह्माचे आविष्करण करते, त्याला अभिव्यक्त करते, त्याचे विवरण करते.

आविष्कृत झालेल्या समग्र प्रकृतीला, शाश्वत ब्रह्माच्या संपर्कामध्ये आणणे, हे सौंदर्याचे कार्य असते. तुमचे उन्नयन करणारी, तुम्हाला उच्चतर गोष्टीकडे घेऊन जाणारी एक आदर्श अशी भावना तुमच्यामध्ये विद्यमान असते. अशा आदर्श भावनेद्वारे, आकाराच्या पूर्णत्वाद्वारे आणि सुसंवादाद्वारे हे कार्य केले जाते.

– श्रीमाताजी (CWM 12 : 232)

*

सौंदर्य आणि आनंद

आनंदाने धारण केलेले रूप म्हणजे सौंदर्य. पण हे रूप फक्त भौतिक आकारातच असले पाहिजे असे नाही. सुंदर विचार, सुंदर कृती, सुंदर जीव असाही त्याचा विचार होऊ शकतो. आपण जेव्हा सौंदर्याविषयी बोलत असतो तेव्हा तो आविष्करणातील, या सृष्टीमधील आनंद असतो.

आविष्करणाच्या अतीत गेल्यावर सौंदर्य हे आनंदामध्ये हरवून जाते किंवा सौंदर्य आणि आनंद हे एकमेकांमध्ये इतके एकजीव होतात की त्यांच्यामध्ये भेदच शिल्लक राहत नाही, असेही तुम्ही म्हणू शकता.

– श्रीअरविंद (CWSA 27 : 700)

*

ईश्वर हा सौंदर्यरूप आहे. वृंदावनातील श्रीकृष्ण हा श्यामसुंदर आहे.

तो केवळ सौंदर्यरूप नसून, तो मूर्तिमंत प्रेमच आहे. परिपूर्ण प्रेमाशिवाय परिपूर्ण सौंदर्य असू शकत नाही आणि परिपूर्ण सौंदर्याशिवाय परिपूर्ण आनंदही असू शकत नाही.

वर्तनामागील सौंदर्यात्मक प्रेरणा या वर्तनावर मर्यादा घालणाऱ्या असतात आणि मानवतेला जर उन्नत व्हायचे असेल तर तिने या मर्यादा ओलांडल्या पाहिजेत.

– श्रीअरविंद (CWSA 01 : 443)

*

सौंदर्यानंद

सौंदर्य आणि आनंद, यांचे रूप कोणत्याही प्रकारचे असले तरी, येथे आपण त्या दोहोंचा एकच म्हणून विचार करत आहोत, सौंदर्यानंद चिरतरुण असतो, तो एक शाश्वत क्षण असतो, ती एक अमर्त्य उपस्थिती असते.

– श्रीअरविंद (CWSA 26 : 255)

*

सौंदर्यविषयक विवेक

साधक : सौंदर्यविषयक विवेक म्हणजे काय?

श्रीमाताजी : सौंदर्यविषयक विवेक म्हणजे सौंदर्याची चेतना. आणि सौंदर्याशी, कलेशी संबंधित असणारे शास्त्र म्हणजे सौंदर्यशास्त्र.

अशी काही माणसं असतात की जी जीवन जगत असताना, निसर्गदृश्यं पाहतात, व्यक्तींकडे पाहतात, वस्तू पाहतात पण त्या गोष्टी सुंदर आहेत किंवा नाही याची त्यांना यत्किंचितही जाणीव नसते. आणि त्याने त्यांना काही फरकही पडत नाही. अशी माणसं आकाशाकडे पाहतात, आकाशात ढग आहेत की नाहीत, पाऊस पडेल की आकाश निरभ्र आहे हे पाहतात, आज खूप ऊन आहे का, थंड वारे वाहणार आहेत का इत्यादी गोष्टी ते पाहतात.

परंतु अशीही काही माणसं असतात की, ज्यांची नजर आकाशाकडे गेली तर त्याचे सौंदर्य त्यांना जाणवते. त्याकडे पाहून त्यांना आनंद

महालक्ष्मीचा एक पैलू – सुसंवाद

दृश्यमान विसंवादाचे कारण

हे विश्व किंवा ब्रह्मांड म्हणजे एक सुसंवाद आहे. अन्यथा त्याचे अस्तित्वच टिकून राहू शकले नसते; त्याचे तुकडेतुकडे झाले असते.

ज्याप्रमाणे संगीतातील सुसंवाद अंशतः किंवा प्राधान्याने विसंवादी सुरांच्या साहाय्याने निर्माण होतो तीच गोष्ट भौतिक विश्वाबाबतही आहे. हे भौतिक विश्वदेखील, त्यातील घटकांचा स्वतंत्रपणे विचार केला असता, विसंवादी आहे; त्यातील प्रत्येक घटक हा दुसऱ्या घटकाशी मोठ्या प्रमाणावर विसंवादी आहे. पण त्याच्या पाठीशी ईश्वरी संकल्प कार्यरत आहे. ज्यांच्यापाशी या विश्वाकडे पाहण्याची विश्वात्मक दृष्टी आहे त्यांच्यासाठी समग्र विश्व म्हणजे अजूनही एक सुसंवादच आहे.

पण हा सुसंवाद उत्क्रांतिमय असून तो प्रगत होत आहे. याचा अर्थ असा की, अजूनपर्यंत साध्य न झालेल्या एका ध्येयाच्या पूर्तीसाठी सर्व घटक एकत्रितपणे प्रयत्नशील आहेत. या ध्येयाप्रत पोहोचण्यासाठी त्वरा करणे हेच आपल्या पूर्णयोगाचे उद्दिष्ट आहे.

जेव्हा ते ध्येय साध्य झालेले असेल तेव्हा, एक सुसंवादांचा सुसंवाद अस्तित्वात येईल आणि आत्ताच्या विसंवादावर आधारलेल्या सुसंवादाची तो जागा घेईल.

सद्यस्थितीत वरकरणी पाहता गोष्टींमध्ये जो विसंवाद आढळतो त्याचे हे स्पष्टीकरण आहे.

– श्रीअरविंद (CWSA 30 : 282-283)

*

निसर्गातील तालबद्धता

प्रत्येक कृतीसाठी, प्रत्येक साक्षात्कारासाठी, प्रत्येक गतिविधीसाठी निश्चित असा कालावधी असतो, तो भिन्न भिन्न असतो.

अनेक कालावधी असे एकमेकांमध्ये गुंतलेले असतात; परंतु प्रत्येक

महालक्ष्मीचा एक पैलू – प्रेम

मानवी प्रेम अस्थायी का?

(श्रीमाताजींनी श्रीअरविंद लिखित The Mother या ग्रंथातील पुढील भाग वाचून दाखविला.)

मनाचा आणि आत्म्याचा सुमेळ व सौंदर्य, विचार आणि भावना यांचा सुमेळ व सौंदर्य, प्रत्येक बाह्य कृतीमध्ये आणि हालचालीमध्ये सुमेळ व सौंदर्य, जीवन आणि त्याच्या अवतीभोवतीचा परिसर यांच्यामध्ये सुमेळ व सौंदर्य, ही महालक्ष्मीची अपेक्षा असते.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 20-22)

*

(वरील वचनाचे श्रीमाताजींनी स्पष्टीकरण केले आहे.)

सभोवताल, परिस्थिती, वातावरण, जीवनसरणी आणि सर्वाधिक महत्त्वाचे म्हणजे आंतरिक दृष्टिकोन जर अधम, असभ्य, असंस्कृत, अहंकारी, नीच असेल तर, तेथे प्रेम येण्यास नाखूष असते; अशा ठिकाणी ते स्वतःचा आविष्कार करण्यास नेहमीच काचकूच करते आणि सहसा ते तेथे जास्त काळ टिकून राहत नाही.

दिव्य सौंदर्य आपल्यापाशी राहावे असे जर आपल्याला वाटत असेल तर, आपण त्याला राहण्यासाठी तेवढेच सुंदर घर दिले पाहिजे. मी बाह्य गोष्टींविषयी म्हणजे खरेखुरे घर, खरेखुरे फर्निचर आणि तत्सम गोष्टींविषयी बोलत नाहीये तर, मी आंतरिक दृष्टिकोनाबाबत बोलत आहे. आपला आंतरिक दृष्टिकोन नेहमीच सुंदर, उदात्त, सुसंवादी, निःस्वार्थी असला पाहिजे. तरंच तिथे प्रेम येऊन राहू शकते.

पण ते आविष्कृत होण्याच्या प्रयत्नात असताना जर का, त्यामध्ये लगेचच नीच आणि कुरूप मिसळल्या गेल्या, तर मग ते तेथे राहत नाही, ते तिथून निघून जाते. यालाच श्रीअरविंदांनी 'उदयास येण्यास अनुत्सुक' असे म्हटले आहे. याचा अर्थ असा की, आपण इथे का आलो याचा

नमस्कार वाचकहो,

अभीप्सा मासिकातील काही पाने आपल्या अवलोकनार्थ येथे देण्यात आली होती. आपल्याला ह्या अंकातील विषयावरील आणि यासारख्या इतर विषयांवरील श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांचे विचार मराठीत समजून घ्यावयाचे असतील तर, आपण अभीप्सा मासिकाचे वर्गणीदार व्हावे, ही विनंती.

वर्गणीचा तपशील शेजारील पानावर दिला आहे.

– संपादक, अभीप्सा मासिक

मासिकाचे स्वरूप

श्रीअरविंदांचे बहुतांशी सारे साहित्य मुळात इंग्रजी व बंगाली भाषेत आहे. तर श्रीमाताजी यांचे बहुतांशी वाङ्मय फ्रेंच व इंग्रजी भाषेत आहे. हे दुर्मिळ विचारधन मराठीत आणण्याचे प्रयत्न 'अभीप्सा' या मासिकाच्या माध्यमातून अव्याहतपणे चालू आहेत. पाँडिचेरीहून प्रकाशित होणाऱ्या श्रीअरविंद सोसायटीचे मुखपत्र असलेल्या 'ऑल इंडिया मॅगेझिन' या इंग्रजी मासिकाची मराठी आवृत्ती म्हणजे 'अभीप्सा.' १९७५ पासून हे मासिक नियमितपणे प्रकाशित होत आहे.

वर्गणी व देणगीचा तपशील

वार्षिक वर्गणी : २०० रू. (१२ अंक)
तीन वर्षाचे दर : ५८० रू. (३६ अंक)
पाच वर्षांचे दर : ९६० रू. (६० अंक)
देणगीदार : ४००० रू.
(देणग्या 80 G अंतर्गत करसवलतीस पात्र आहेत.)

वर्गणी वा देणगीची रक्कम आपण ऑनलाईनदेखील भरू शकता.

वर्गणी वा देणगी ऑनलाईन भरण्यासाठी बँकेचा तपशील

खातेदाराचे नाव : Sri Aurobindo Society
बँकेचे नाव : Central Bank of India, Pondicherry Branch
IFSC Code : CBIN0281354
A/C No. : 1235467709

*

सूचना : रक्कम भरल्याची पोहोचपावती व आपला संपूर्ण पत्ता membership@aurosociety.org आणि editorabhipsa2018@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा ही विनंती; म्हणजे आपल्या पत्त्यावर अंक पाठवता येईल.

*

वर्गणीदारांना काही कारणाने अंक उपलब्ध न झाल्यास पुढील क्रमांकावर संपर्क करावा – श्री. गोविंद पोतदार ९३७३७२४५२०

धनशक्तीचे समर्पण

...''प्रथम ती धनशक्ती दिव्य मातेसाठी पुन्हा एकदा जिंकून घ्यावी लागेल आणि ज्यांच्या प्रकृतीमध्ये हा पैलू बलवान, विशाल आणि अहंकारमुक्त असेल आणि जे कोणत्याही प्रकारचा हक्क न सांगता किंवा स्वतःसाठी हातचे काही राखून न ठेवता किंवा कोणताही संकोच न बाळगता पूर्णपणे समर्पित झालेले असतील आणि जे परम शक्तीचे विशुद्ध आणि सामर्थ्यशाली माध्यम झालेले असतील तेच या विजयासाठी सर्वाधिक समर्थ ठरतील.''

हे श्रीअरविंद लिखित वचन वाचताना आपल्याला नकळतपणे आठवण होते ती नवजात ऊर्फ केशव देव पोद्दार यांची. ते मुंबईमधील एक सुप्रसिद्ध उद्योगपती होते. त्यांनी आपला सर्व उद्योगव्यवसाय बंद केला आणि ते श्रीअरविंद व श्रीमाताजींच्या सेवेत रुजू झाले. श्रीमाताजींनी त्यांना 'नवजात' असे नामाभिधान दिले. नवजात यांच्या रूपाने जणू धनशक्तीच श्रीमाताजींच्या चरणी समर्पित झाली होती.

कलकत्त्यातील एका जमिनीच्या व्यवहारातून आश्रमासाठी आवश्यक पैसा उभारण्याचे काम श्रीमाताजींनी नवजात यांच्यावर सोपविले. नवजात आवश्यक ती सर्व कागदपत्रे घेऊन संबंधित कचेरीत गेले. एका अधिकाऱ्याने ती कागदपत्रे रात्रभर बसून तपासली. आता फक्त कार्यालयातील अधीक्षकाने ती पाहून मंजूर करणे बाकी होते. पण अधीक्षक व्यस्त होते. कागदपत्रांकडे पाहायलाही त्यांना वेळ नव्हता. नवजात यांनी परोपरीने प्रयत्न करून पाहिले, पण काही उपयोग झाला नाही. शेवटी त्यांना जाणवले की, ''हे काम आता माझ्या आवाक्याबाहेरचे आहे.'' त्यांनी मनोमन श्रीमाताजींची प्रार्थना केली आणि ते घरी गेले. आणि दुसऱ्या दिवशी ते कार्यालयात परतले, तर अधीक्षकाने कागदपत्रे आधीच तपासून मंजूर केली होती. त्वरेने पहिला धनादेश आश्रमाकडे पाठवला गेला.

आर्थिक शक्ती हाताळण्याच्या त्यांच्या कौशल्याचे मूर्त रूप म्हणजे ऑरोविल या वैश्विक नगरीसाठी त्यांनी खरेदी केलेली जमीन आणि श्रीअरविंद सोसायटी!

– (श्री. नवजात यांनी सांगितलेल्या आठवणींच्या आधारे...)

*